

## मावळमध्ये विकास कामांचा धडाका

e Paper

दैनिक **मेट्रो सिटी वृत्तांत**

वर्ष 4थे

www.metrocityvrutant.in | रविवार दिनांक 15/06/२०२५ | METRO CITY VRUTANT

संपादक : रफी हुसेन || पिंपरी चिंचवड व पुणे || पान 4 || अंक 131 || RNI - MAHMAR /2021/51259 || metrocity924@gmail.com

# विद्यार्थ्यांचे परदेशी शिक्षणाचे स्वप्न आता भारतातच पूर्ण होणार : मुख्यमंत्री

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

मुंबई: भारतीय विद्यार्थ्यांना परदेशातील विद्यापीठांमध्ये उच्च शिक्षणासाठी जाण्याची गरज राहणार नाही कारण आज राज्य शासनाने राष्ट्रीय शिक्षण धोरणातंर्गत पाच परदेशी विद्यापीठांसोबत आशयपत्र प्रदान केले आहे. आंतरराष्ट्रीय विद्यापीठांचे भारतातील पहिले शैक्षणिक हब मुंबई, नवी मुंबईत उभारण्यात येत असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले.



हॉटेल ताज येथे 'मुंबई रायझिंग : क्रिएटिंग अॅन इंटरनॅशनल एज्युकेशन सिटी' या पाच जागतिक विद्यापीठांना (एलओआय) आशयपत्र प्रदान करण्याचा कार्यक्रम पार पडला कार्यक्रमात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस बोलत होते.यावेळी केंद्रीय शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान, उच्च आणि तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील,केंद्रीय शिक्षण सचिव तथा विद्यापीठ अनुदान आयोगाचे अध्यक्ष विनित जोशी,अपर मुख्य सचिव असिमकुमार गुप्ता, सिडकोचे व्यवस्थापकीय संचालक विजय सिंघल, ब्रिटनच्या उच्चायुक्त लिंडी कॅमेरॉन, ऑस्ट्रेलियाचे कॉन्सुल जनरल पॉल मर्फी,अमेरिकेचे कॉन्सुल जनरल माईक हँकी, इटलीचे कॉन्सुल जनरल वॉल्टर फेरारा, अॅबर्डीन विद्यापीठाचे उपप्राचार्य ग्लोबल एंगेजमेंट प्रा.सिलादित्य भट्टाचार्य, यॉर्क विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. चार्ली जेफ्री, वेस्टर्न ऑस्ट्रेलिया विद्यापीठ उपकुलगुरू गॉय लिटलफेअर, इलिनॉय इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजीचे अध्यक्ष इलिनॉय टेक राज ईचंबाडी, आयईडी चे रिकार्डो बाल्बो,अधिष्ठाता,विविध विद्यापीठांचे प्रतिनिधी उपस्थित होते.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की,युनिव्हर्सिटी ऑफ अॅबर्डीन (स्कॉटलंड, यु.के.),युनिव्हर्सिटी ऑफ यॉर्क (यु.के.),युनिव्हर्सिटी ऑफ वेस्टर्न ऑस्ट्रेलिया (ऑस्ट्रेलिया),इलीनॉय इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी (अमेरिका),इस्तितुतो यूरोपीओ दी डिझाईन (इटली) ही जगातील पाच नामवंत विद्यापीठे भारतात येत आहेत. नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ परिसरात ही विद्यापीठे उभी राहणार आहेत.याचं परिसरात येत्या काही वर्षात मेडिसिटी,स्पोर्टस सिटी आणि इनोव्हेशन सिटी उभारणारण्यात येणार आहे. येथे आगामी कालावधीत दहा विद्यापीठ एकत्र येतील अशी संकल्पना राबवण्याचा विचार आहे. सध्या या पाच विद्यापीठांमुळे हा परिसर पूर्ण शिक्षण आणि संशोधन साठी ओळखला जाईल.मुंबईची सध्या वित्तीय,औद्योगिक आणि मनोरंजन उद्योगाचे शहर म्हणून ओळख आहे. विद्यापीठामुळे एज्युकेशनल सिटी अशी ओळख होईल.विकसित भारत २०४७ मध्ये हा निर्णय महत्वाची भूमिका बजावेल.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, अॅबरडीन विद्यापीठ, यॉर्क विद्यापीठ, वेस्टर्न ऑस्ट्रेलिया विद्यापीठ, इलिनॉय इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी आणि इस्टिट्यूटो युरोपियो डी डिझाईन हे मुंबई,नवी मुंबईत पूर्ण कॅम्पस आणणार आहेत – राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२० शी सुसंगत अशा प्रकारचा हा पहिलाच उपक्रम नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ विकसित होत आहे. अटल सेतू निर्माण झाला आहे.

# कोविड-19 परिस्थितीचा उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्याकडून आढावा

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

पुणे राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी विधानभवन येथे आयोजित बैठकीत पुणे विभागातील कोविड-१९ साथीच्या अनुषंगाने आढावा घेतला. लक्षणे सौम्य असली तरी वृद्ध तसेच सहव्याधी असलेल्या व्यक्तींनी विशेष काळजी घेणे आवश्यक असून आरोग्य विभाग, महानगरपालिका तसेच इतर स्थानिक स्वराज्य संस्थांनी समन्वयाने काम करावे, अशा सूचना त्यांनी यावेळी दिल्या.



बैठकीस विभागीय आयुक्त डॉ. चंद्रकांत पुलकुंडवार, पुणे महानगरपालिका आयुक्त नवलकिशोर राम, पिंपरी चिंचवड महानगरपालिका आयुक्त शेखर सिंह, पुणे जिल्हाधिकारी जितेंद्र डूडी, आरोग्य संचालक डॉ. विजय कंदेवाड यांच्यासह दूरदृष्यप्रणालीद्वारे कोल्हापूर मनपा आयुक्त के. मंजुलक्ष्मी, कोल्हापूर, सातारा, सोलापूर, सांगली जिल्ह्याचे जिल्हाधिकारी, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आदी उपस्थित होते.

यावेळी डॉ. कंदेवाड यांनी कोविड-19 च्या अनुषंगाने सादरीकरण केले. सद्यस्थितीत तपासणीमध्ये ओमीक्रॉनचे जेएन, एक्सएफजी व जीएफ7-9 हे उपप्रकार आढळून येत आहेत. या प्रकारामुळे ताप, खोकला, घसा दुखणे असे सौम्य आजार होतात. फक्त रक्तशर्करा, कर्करोग आदी सहव्याधी कमी असलेले, रोग प्रतिकार शक्ती कमी असलेले नागरीक आदींना थोडा धोका जास्त आहे. अशांनी गर्दीत जाणे टाळावे. हात स्वच्छ धुणे, मास्क वापरणे तसेच सुरक्षित अंतर ठेवावे. श्वसनदाह वाढल्यास त्वरीत जवळच्या दवाखान्यात जाऊन तपासणी व इलाज करावा, असे यावेळी सांगण्यात आले.

सहायक संचालक डॉ. प्रशांत वाडीकर, विभागातील सर्व जिल्हा शल्य चिकित्सक व जिल्हा आरोग्य अधिकारी यावेळी होते. त्यांना कोविड व वारीबाबत काळजी घेण्याच्या सूचना व सर्व रुग्णालये कोविडच्या संभाव्य साथीसाठी सज्ज ठेवण्याच्या व सतत माहिती सादर करण्याच्या सूचना देण्यात आल्या.

# मावळमध्ये विकास कामांचा धडाका

## आहिरवडेतील जोडरस्त्याचे काम सुरू

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत




मावळ - शिवसेना खासदार श्रीरंग बारणे यांनी मावळ तालुक्यात विकास कामांचा सपाटा सुरूच ठेवला आहे. ग्रुप ग्रामपंचायत आहिरवडे येथील जोड रस्त्यांसाठी पाठपुरावा करून ५० लाखांचा निधी मंजूर करून आणला. त्यातून राष्ट्रीय राजमार्ग ४ ते आहिरवडे जोडरस्त्याच्या सुधारणा कामांचे भूमिपूजन खासदार बारणे यांच्या हस्ते गुरुवारी झाले.

यावेळी शिवसेना उपजिल्हा प्रमुख शरदराव हुलावळे, युवासेना मावळ लोकसभा अध्यक्ष विशाल हुलावळे, शिवसेना उपतालुका प्रमुख धनंजय नवघने, शिवसेना देहूगाव शहर प्रमुख सुनिल हगवणे, सरपंच सविता काजळे व उपसरपंच स्वाती पाराटे उपस्थित होते. तसेच नवनाथ हरपुडे, संभाजी शिंदे, भाऊ बराटे, दिपक चव्हाण, सचिन चव्हाण, सतीश इंगवले, मदन शेडगे व ग्रामस्थ उपस्थित होते. खासदार बारणे यांनी सर्वाधिक निधी डोंगरभाग, आदिवासी पाडे असलेल्या मावळ तालुक्याला दिला आहे.

जिल्हा नियोजन समिती, खासदार निधी मावळच्या विकासासाठी दिला आहे. राजमार्ग ४ ते आहिरवडे जोड रस्त्यामुळे परिसरातील नागरिकांच्या दळणवळणात मोठी सोय होणार असून, स्थानिक विकासाला गती मिळणार आहे. ग्रामस्थांनी खासदारांच्या या प्रयत्नाचे कौतुक करत आभार मानले. उपस्थित मान्यवरांनी या कामाचे लवकरात लवकर पूर्णत्वासाठी सहकार्य करण्याचे आश्वासन दिले.

खासदार बारणे म्हणाले की, मावळ तालुका मोठ्या प्रमाणात विस्तारला आहे. कमी लोकवस्ती असलेली गावे आहेत. या गावांमधील अंतर्गत रस्ते पक्के नाहीत. त्यामुळे नागरिकांचे हाल होत होते. गावातील रस्ते विकास करण्यावर भर दिला. वाड्या, वस्त्यांपर्यंत रस्ते करण्यास प्राधान्य दिले आहे. सर्वाधिक निधी मावळसाठी दिला आहे. दीनदयाळ योजनेअंतर्गत दुर्गम भागातील गावांमध्ये वीज पोहोचविली आहे.

राजमार्ग ४ ते आहिरवडे या जोड रस्त्याची दुरवस्था झाली होती.

या रस्त्याची दुरुस्ती करण्याची स्थानिकांनी मागणी केली होती.

त्यानुसार या कामासाठी ५० लाख रुपयांचा निधी दिला आहे.

त्यातून रस्त्याच्या कामाला सुरुवात केली आहे. काम वेगात आणि दर्जेदार करण्याच्या सूचना संबंधित ठेकेदाराला दिल्या आहेत. या जोड रस्त्यामुळे परिसरातील नागरिकांच्या दळणवळणाची मोठी सोय होणार आहे.

# विद्यार्थ्यांच्या कर्तृत्वाचा गौरव...

## झेप' उपक्रमाचा समारोप प्रेरणादायी वातावरणात संपन्न !

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत




पुणे : पद्मश्री महर्षी डॉ. सौ. सिंधुताई सपकाळ (माई) संस्थापित ‘सप्तसिंधू’ महिला आधार, बालसंगोपन व शिक्षण संस्था, संचलित ‘सन्मती बाल निकेतन”, मांजरी (बु.), पुणे येथे 'झेप' (वर्ष ३ रे ) उपक्रमाचा समारोप कार्यक्रम उत्साहात पार पडला. विलू पूनावाला फाउंडेशनचे मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. जसविंदर नारंग सर यांची समारोप समारंभात प्रमुख पाहुणे आणि अध्यक्षीय स्वरूपात विशेष उपस्थिती लाभली. त्यांच्यासमवेत द सिरम इन्स्टिट्यूट ऑफ इंडियाचे श्री. रोहित शिंदे आणि श्री. विजय कोल्हटकर, ममता बाल सदनचे अध्यक्ष श्री. दिपक गायकवाड, तसेच द मदर ग्लोबल फाउंडेशनचे अध्यक्ष श्री. विनय सपकाळ हे उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरुवात माईच्या कन्या व संस्थेच्या अध्यक्षा मा. ममता सिंधुताई सपकाळ यांच्या प्रास्ताविकाने झाली त्यांनी ‘झेप’ उपक्रमाच्या उद्देशांवर प्रकाश टाकत सांगितले की, "ही केवळ उपक्रमाची सांगता नसून विद्यार्थ्यांमध्ये निर्माण झालेल्या आत्मविश्वासाचा आणि प्रगतीचा एक टप्पा आहे. नारंग सर यांनी आपल्या मनोगतात म्हटले की, "अनाथ मुलांना ते अनाथ असल्याची जाणीव न होऊ देता, त्यांना कुटुंबवत प्रेम, योग्य शिक्षण आणि सुविधा देणे हेच आदरणीय माई आणि आदरणीय आदर पूनावाला सर यांचे ध्येय आहे. गेल्या पाच वर्षांपासून मी ही संस्था जवळून पाहत असून तिचे कार्य अत्यंत प्रेरणादायी आहे"मान्यवरांच्या हस्ते संस्थेतील गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला, विविध भाषांमध्ये विद्यार्थ्यांनी आणि कर्मचाऱ्यांनी आपली मनोगते व्यक्त केली, या प्रसंगी नेस वाडिया कॉलेजच्या प्राचार्या डॉ. वृषाली रणधीर यांनी यंदा पासून दहावीमध्ये प्रथम क्रमांक मिळवणाऱ्या संस्थेतील विद्यार्थ्यांसाठी रु. ५०००/- ची शिष्यवृत्ती सुरू केली आहे.

कार्यक्रमाचे सुत्रसंचालन श्री. दिनेश शेटे, पाहुण्यांचा परिचय श्री. प्रताप चिंचोले, तर आभार प्रदर्शन सौ. पद्मा शिंदे यांनी केले. 'झेप' उपक्रमाने विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास, संवादकौशल्य, आणि कलेच्या विविध अंगाचा विकास साधत त्यांच्यातील सुप्त गुणांना नवी दिशा दिली आहे. हा उपक्रम अधिकाधिक विद्यार्थी आणि समाजासाठी प्रेरणास्थान ठरेल, याची खात्री आहे.

# मैत्रिणीच्या छळामुळे तरुणाची पुण्यामध्ये आत्महत्या

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत



मैत्रिणीकडून होणाऱ्या छळामुळे जमीन-खरेदी विक्रीचा व्यवसाय करणाऱ्या तरुणाने नवले पुलाजवळील एका लॉजमध्ये गळफास घेऊन आत्महत्या केली.कार्तिक बाबू शेट्टीयार (वय ३४, रा. संतोषनगर, कात्रज) असे आत्महत्या केलेल्या तरुणाचे नाव आहे. याप्रकरणी तरुणीविरुद्ध आत्महत्येस प्रवृत्त केल्याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत कार्तिक याचा भाऊ तंगराज बाबू शेट्टीयार (वय ३८) यांनी फिर्याद दिली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, कार्तिक हा जमीन-खरेदी विक्रीचा व्यवसाय करत होता. तरुणी ही नृत्याचे कार्यक्रम करते. दोघांमध्ये मैत्री झाली. ३० एप्रिल रोजी दोघे नवले पुलाजवळील एका लॉजमध्ये गेले होते. दोघांमध्ये वाद झाल्यावर कार्तिकने ओढणीच्या सहाय्याने गळफास घेऊन आत्महत्या केली.कार्तिकचे नातेवाईक आणि मित्रांना ही माहिती मिळाल्यानंतर त्यांनी त्याला उपचारासाठी रुग्णालयात दाखल केले होते. याबाबत सुरुवातीला अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली होती.

कार्तिकच्या सांगण्यावरून त्याच्या मित्रांनी तरुणीला पैसे दिले होते. तरुणीबाबतची माहिती तंगराज यांना मिळाली होती. त्यांनी याबाबत कार्तिककडे विचारणा केली. तेव्हा संबंधित तरुणी ही मैत्रीण असल्याचे त्याने तंगराज यांना सांगितले होते. तरुणी त्रास देत असून, तिच्या त्रासामुळे आत्महत्या करावे लागेल, असे कार्तिकने तंगराज यांना सांगितले होते. कार्तिक याच्या आत्महत्येस तरुणी जबाबदार असल्याचे तंगराज यांनी फिर्यादीत म्हटले आहे.

# मोदी सरकारचे विकासाला प्राधान्य - शत्रुघ्न काटे

## पंतप्रधान मोदी सरकारच्या 'आत्मनिर्भर भारत' ते 'विकसित भारत' अशा यशस्वी ११ वर्षांच्या कार्यकाळाचा मांडला आढावा

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत




पिंपरी-चिंचवड: गेल्या ११ वर्षांत मोदी सरकारने पारदर्शकता, प्रामाणिकता, गतीशीलता आणि निर्णयक्षमतेसह कार्य केले आहे. पूर्वीच्या भ्रष्टाचार, घोटाळे आणि तुष्टीकरणाच्या राजकारणाला पूर्णविराम देऊन विकासाला प्राधान्य देण्यात आले.

'शासन म्हणजे सेवा' ही संकल्पना प्रत्यक्षात आणली गेली. तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर करून प्रशासनात पारदर्शकता आणि उत्तरदायित्व वाढवले गेले. डायरेक्ट बेनिफिट ट्रान्सफर (DBT) प्रणालीमुळे योजनांचे लाभ थेट लाभार्थ्यांच्या खात्यात जमा होत असल्याने मध्यस्थांचा वाटा पूर्णपणे संपला आहे. वस्तू व सेवा कर (GST) प्रणालीमुळे करप्रणालीत सुसूत्रता येऊन भ्रष्टाचाराला आळा बसला आहे. याच काळात कलम ३७० हटवून जम्मू-काश्मीरचा भारताशी असलेला संबंध अधिक दृढ करण्यात आला, जो ऐतिहासिक निर्णय ठरला, असे गौरवोद्गार भाजपा शहराध्यक्ष शत्रुघ्न (बापू) काटे यांनी काढले. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील केंद्र सरकारने ११ वर्षांचा कार्यकाळ यशस्वीरित्या पूर्ण केल्याबद्दल पिंपरी-चिंचवड शहर भाजपने मोरवाडी, पिंपरी येथील मध्यवर्ती कार्यालयात पत्रकार परिषद आयोजित केली होती. यावेळी, भाजप शहराध्यक्ष शत्रुघ्न (बापू) काटे यांनी या परिषदेत सरकारच्या 'सेवा, सुशासन आणि गरीब कल्याण' या त्रिसूत्रीवर आधारित विविध योजना, महत्त्वपूर्ण निर्णय आणि प्रभावी उपक्रमांची सविस्तर माहिती दिली. 'आत्मनिर्भर भारत' ते 'विकसित भारत' अशा दूरदृष्टीच्या संकल्पाकडून भारताने सिद्धीकडे यशस्वी वाटचाल केली असून, या ११ वर्षांतील अभूतपूर्व कार्यक्षमतेवर यावेळी प्रकाश टाकण्यात आला. यावेळी, आमदार अमित गोरखे, आमदार उमाताई खापरे, माजी खासदार अमर साबळे, माजी आमदार अश्विनीताई जगताप, युवा मोर्चा प्रदेशाध्यक्ष अनुप मोरे, दक्षिण आघाडी प्रदेशाध्यक्ष राजेश पिल्ले, प्राधिकरणाचे माजी अध्यक्ष सदाशिव खाडे, प्रदेश सदस्य मोरेश्वर शेडगे, महेश कुलकर्णी, चंद्रकांत नखाते, संतोष कलाटे, महिला मोर्चा अध्यक्ष सुजाता पालांडे, सरचिटणीस संजय मंगोडेकर, अजय पाताडे, वरिष्ठ उपाध्यक्ष राजाभाऊ दुर्गे, युवा मोर्चा अध्यक्ष राज तापकीर, भाजपा ओबीसी आघाडी प्रदेश सरचिटणीस मनोज ब्राह्मणकर, भाजपा भटके-विमुक्त आघाडी प्रदेश उपाध्यक्ष कैलास सानप, सोशल मीडिया प्रभारी संजीवनी पांडेय, अमेय देशपांडे आदी उपस्थित होते.

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

रविवार दिनांक 15/06/२०२५

पिंपरी चिंचवड | पुणे

e Paper

# ड्रेनेज लाईन कामाची शालेय विद्यार्थ्यांना अडचण येऊ नये

## माजी नगरसेविका प्रियंका बारसे यांच्या संबंधितांना सूचना

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

पिंपरी चिंचवड महानगरपालिका वतीने गवळीनगर प्रभागातील बन्सल सिटी परिसरात ड्रेनेज लाईन टाकण्याचे काम सुरू आहे. तथापि पावसाळी वातावरण असल्याने या कामात अनेक अडचणी निर्माण होत आहेत. सोमवारपासून या भागात शाळा सुरू होत आहेत, शालेय विद्यार्थ्यांना या कामांचा तसेच या ड्रेनेज लाईन कामामुळे कोणत्याही प्रकारचे अपघात होणार नाही, याची काळजी घेण्याची सूचना या भागातील





माजी नगरसेविका प्रियंका बारसे यांनी संबंधितांना दिले आहेत.

सोमवारपासून शालेय विद्यार्थी मोठ्या प्रमाणात या भागात येण्याची सुरुवात होणार असून, शाळा सुरू होत असल्याने या ड्रेनेज लाईन कामामुळे विद्यार्थ्यांना अडचण येऊ नये तसेच या भागात लवकरात लवकर ड्रेनेज लाईन टाकून घ्यावेत व रस्ता लवकरात लवकर येणे जाण्यासाठी मोकळा करावा याबाबतचे सूचना माजी नगरसेविका प्रियंका बारसे यांनी दिले आहेत.

तसेच या ठिकाणी शालेय पोषण आहाराचे सेंटर सुरू असून तेथील ड्रेनेज चेंबरचे काम अपूर्ण राहिले आहेत तेही सोमवार पूर्वी करून घ्यावे, अशाही सूचना दिल्या. शालेय पोषण आहार योजनेचे काम या ठिकाणी सुरू असते त्याचे खरकटे रस्त्यावर येऊन दुर्गंधी वाढण्याची शक्यता असते, त्यामुळे सेंटर बाहेर त्वरित चेंबर बांधण्याची सूचना संबंधितांना देण्यात आली. याबाबत माहिती देताना माजी नगरसेविका प्रियंका ताई बारसे यांनी सांगितले की, या परिसरात बन्सल सिटी लाईनीतील अनेक नागरिकांचे ड्रेनेज लाईन मुख्य चेंबरला जोडलेले नाहीत तसेच पाण्याचे नळ कनेक्शन आणि ठिकाणी तुटले आहे. ही कामे आरोग्य विभागाचे अधिकारी यांच्या लक्षात आणून देण्यात आले असून, लवकरात लवकर काम पूर्ण करण्यासाठी आम्ही सर्व प्रयत्न करत असल्याचे अभियंते जगताप यांनी सांगितले आहे.

# आषाढीवारी पालखी सोहळ्याची जबाबदारी समन्वयाने पार पाडा

## अतिरिक्त आयुक्तांनी दिल्या सूक्ष्म नियोजनाच्या सूचना

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

पिंपरी :- आषाढीवारी पालखी सोहळ्यासाठी महानगरपालिकेच्या वतीने देण्यात येणाऱ्या सेवा सुविधांमध्ये कोणत्याही प्रकारची कमतरता राहणार नाही याची दक्षता घ्यावी. तसेच सर्व नियोजित कामे विहीत वेळेत पुर्ण करून सर्वांनी समन्वयाने सूक्ष्म नियोजन करून जबाबदारी पार पाडावी, असे निर्देश अतिरिक्त आयुक्त प्रदीप जांभळे पाटील यांनी महापालिका प्रशासकीय यंत्रणेला दिले. संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर महाराज आणि जगदगुरु संत तुकाराम महाराज आषाढीवारी पालखी सोहळ्याचे आगमन येत्या काही दिवसांत पिंपरी चिंचवड शहरात होणार आहे. जगदगुरु संत तुकाराम महाराज आषाढीवारी पालखी सोहळा स्वागत कक्ष आणि मुक्कामाच्या स्थळांची तसेच संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर महाराज पालखी सोहळा मार्ग, विसाव्याचे ठिकाण तसेच महापालिकेच्या वतीने उभारण्यात येणाऱ्या स्वागत कक्षाच्या ठिकाणांची पाहणी करून आवश्यक सूचना आज अतिरिक्त आयुक्त प्रदीप



जांभळे पाटील यांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिल्या. या पाहणी दौऱ्यावेळी शहर अभियंता मकरंद निकम, सह शहर अभियंता बापूसाहेब गायकवाड, देवन्ना गट्टूवार, नितीन देशमुख, उपआयुक्त अण्णा बोदडे, सचिन पवार, सिताराम बहुरे, कार्यकारी अभियंता वैशाली ननावरे, क्षेत्रीय अधिकारी किरणकुमार मोरे, किशोर ननवरे, निवेदिता घार्गे, सहाय्यक आयुक्त उमेश ढाकणे, मुख्य सुरक्षा अधिकारी उदय जरांडे, मुख्य आपत्ती व्यवस्थापन अधिकारी ओमप्रकाश बहिवाल, विनय ओहोळ, मनोहर जावरानी, महेश कावळे, विजय वायकर सेवानिवृत्त कार्यकारी अभियंता दिलीप धुमाळ, तसेच संबंधित विभागांचे अधिकारी कर्मचारी उपस्थित होते.

आषाढीवारी पालखीने पिंपरी चिंचवड शहराच्या हद्दीमध्ये प्रवेश केल्यानंतर निगडी येथील भक्ती शक्ती येथे सर्व वारकरी बांधव तसेच विश्वस्त आणि दिंडीप्रमुख यांचे याठिकाणी महापालिकेच्या वतीने स्वागत केले जाते. याठिकाणी उभारण्यात येणाऱ्या स्वागत कक्ष तसेच करण्यात येणा-या व्यवस्थेबद्दलची माहिती जांभळे पाटील यांनी घेतली. आकुर्डी येथील विठ्ठल मंदीरामध्ये जगद्गुरु संत तुकाराम महाराज पालखीचा मुक्काम असतो. याठिकाणची देखील त्यांनी पाहणी केली आणि करण्यात येणाऱ्या व्यवस्थेबद्दल माहिती घेतली. आकुर्डी येथील मौलाना अबुल कलाम आजाद उर्दू माध्यमिक विद्यालय येथे दिंड्यांचा मुक्काम असतो. याठिकाणी देखील त्यांनी पाहणी केली आणि दिंड्यांचा मुक्काम ज्या महापालिकेच्या शाळांमध्ये तसेच इतर खाजगी ठिकाणी असतो तेथे महापालिकेच्या वतीने आवश्यक सुविधा पुरविण्याच्या सूचना जांभळे पाटील यांनी दिल्या. खराळवाडी येथील विठ्ठल रुक्मिनी मंदिर, नाशिक फाटा रोड, दापोडी येथील पालखी विसावा आदी ठिकाणी त्यांनी पाहणी केली. याशिवाय पालखी मार्गावर अडथळा ठरणारे अतिक्रमण हटवावे, महिलांसाठी हिरकणी कक्ष उभारावे, विद्युत वाहक तारा हटवाव्यात, पावसाळ्याच्या अनुषंगाने आवश्यक आपत्ती व्यवस्थापन करावे, उघडी गटारे यासंदर्भात आवश्यक कार्यवाही करावी, पिण्याच्या पाण्याचे व्यवस्थापन करावे, तातडीच्या वैद्यकीय सुविधेसाठी आवश्यक ठिकाणी महापालिकेच्या वतीने रुग्णवाहिका उपलब्ध ठेवावी, पालखी मार्गावरील खड्डे बुजविण्याचे काम तसेच पालखी मुक्काम, वारकरी निवास आणि पालखी मार्गावर पुरेशा प्रमाणात फिरते शौचालयांची व्यवस्था करावी. आवश्यक ठिकाणी दिशादर्शक फलक दर्शनी भागात लावावेत, पालखी मार्गावर आवश्यक ठिकाणी स्वतंत्र समन्वयकांची नेमणूक करावी अशा सूचना देखील त्यांनी यावेळी दिल्या.

बातमी व जाहिरातीसाठी संपर्क : 8999948968